ePaper
| वर्ष - 8 | अंक - 333 | UDYAM-MH-26-0158827 |

# शिवरायांच्या 'या' 12 किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश!



महाईन्यूज ™

## आतील पानांत

- जेनिक सिनरची अंतिम फेरीत धडक!
- आर्चरचं १५९६ दिवसांनंतर पुनरागमन
- निवडणूक गैरप्रकार करण्याचा डाव
- समाजवाद वगळण्याचा प्रयत्न

www.mahaenews.com | शनिवार, दि. 12 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



ePaper
# शिवरायांच्या 'या' 12 किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश!

| वर्ष - 8 | अंक - 333 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- जेनिक सिनरची अंतिम फेरीत धडक!
- आर्चरचं १५९६ दिवसांनंतर पुनरागमन
- निवडणूक गैरप्रकार करण्याचा डाव
- समाजवाद वगळण्याचा प्रयत्न


www.mahaenews.com | शनिवार, दि. 12 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## अजित डोवाल यांनी 'ऑपरेशन सिंदूर' बाबत फक्त एक प्रश्न विचारला : पाकड्यांना काही सुचेनासे झाले, मूग गिळून गप्प!

# पाकड्यांचे थोबाड फुटले!

## भारताचा सज्जड दम : याद राखा, पुन्हा नाव काढले आणि दहशतवादी कारवाई केली तर !

। नवी दिल्ली । प्रतिनिधी । महाईन्यूज

**राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी 'ऑपरेशन सिंदूर' बाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. त्यांनी थेट पाकिस्तानची बोलती बंद केली आहे. वारंवार प्रश्न उपस्थित करणाऱ्या पाकिस्तानच्या माध्यमांवरही डोवाल बरसले आहेत. पण, महत्त्वाच्या प्रश्नावर त्यांनी पाकिस्तानच्या राजकारण्यांचे, त्यांच्या लष्कराचे, त्यांच्या माध्यमांचे आणि तेथील नागरिकांचे थोबाड फोडले आहे.**



### काय म्हणाले अजित डोवाल..

'ऑपरेशन सिंदूर' बाबत अजित डोवाल यांनी मोठे वक्तव्य केले आहे. त्यांनी सांगितले की, या ऑपरेशन दरम्यान भारताचे कोणतेही नुकसान झाले नाही. पाकिस्तान कडून होत असलेल्या आरोपाबाबत भारताच्या नुकसानीचा एकही फोटो कुठे दिसला नाही. दुसरीकडे, पाकिस्तानच्या तेरा हवाई अड्डयांच्या विध्वंसाचे फोटो तुम्ही सर्वांनी पाहिले असतील. अजित डोवाल पुढे म्हणाले की, या ऑपरेशन बाबत परदेशी माध्यमांमध्ये अनेक प्रकारच्या गोष्टी सांगितल्या गेल्या. आम्हाला स्वदेशी शस्त्रांच्या वापराचा अभिमान आहे. आम्ही २२ मिनिटांत नऊ दहशतवादी ठिकाणे उद्ध्वस्त केली. भारताच्या लढाऊ आणि धाडसी सैनिकांचा नेहमीच अभिमान वाटतो असे ते म्हणाले.

### लष्करांकडूनही दुजोरा

काही दिवसांपूर्वी भारताच्या लष्करानेही 'ऑपरेशन सिंदूर' बाबत मोठे वक्तव्य केले होते. लष्करी प्रवक्त्याने सांगितले होते की, 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान पाकिस्तानला चीनची मदत कशी मिळाली होती. पाकिस्तानला चीन आणि तुर्कीसारख्या देशांचा पाठिंबा कसा मिळत होता, कोण त्यांना शस्त्रास्त्र पुरवठा करत होते, तर कोण भारतीय लष्कराच्या हालचालींच्या 'रिअल-टाइम' उपग्रह चित्रांचा पुरवठा करत होते. तरीही, भारताने आपल्या शत्रूंना असा धडा शिकवला की, पाकिस्तान आजही त्या जखमेला विसरू शकलेला नाही. हा खुलासा दुसऱ्या कोणी नाही, तर भारतीय लष्कराच्या उपप्रमुखांनी स्वतः केला होता.

### अनेक शत्रूंचा सामना

लष्कराचे उपप्रमुख लेफ्टनंट जनरल राहुल आर. सिंह यांनी सांगितले की, 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान सीमेवर एक नव्हे, तर अनेक शत्रू उपस्थित होते. जनरल सिंह म्हणाले की, 'ऑपरेशन सिंदूर' मधून काही महत्त्वाचे धडे मिळाले आहेत, जे शेअर करणे आवश्यक आहे. सर्वप्रथम, एका सीमेवर दोन नव्हे, तर तीन किंवा चार शत्रू होते. पाकिस्तान समोर दिसत होता, पण खरे तर तो फक्त एक चेहरा होता, बाकी शत्रू पडद्यामागून लढत होते, आणि ते जास्ती धोकादायक होते त्यांचा आम्ही सामना केला.

### पाकची 81 टक्के युद्धसामग्री चीनकडून

लेफ्टनंट जनरल सिंह पुढे म्हणाले, की पाकिस्तानला चीनकडून सर्व प्रकारची मदत मिळत होती, ही काही नवीन गोष्ट नाही. गेल्या पाच वर्षांच्या आकडेवारीनुसार, पाकिस्तानला मिळणारी ८१ टक्के युद्धसामग्री चीनकडून येते. जनरल सिंह यांनी हेही सांगितले की, चीन अशा युद्धकालीन परिस्थितीचा उपयोग आपल्या शस्त्रास्त्रांची चाचणी आणि तपासणी करण्यासाठी करतो. त्यांनी सांगितले की, चीनला कदाचित असे वाटले की, त्यांना एक प्रकारची 'लाइव्ह लॅब' मिळाली आहे, ज्यामध्ये ते आपली शस्त्रास्त्रे विविध प्रणालींविरुद्ध तपासू शकतात.

### चीनचा दृष्टिकोन घातक

पाकिस्तानचा वापर चीन एखाद्या खेळण्याप्रमाणे करत आहे. त्यांच्या शस्त्रांच्या चाचणीसाठी पाकिस्तानची युद्धभूमी आहेच. पण, जास्तीत जास्त शस्त्रांची विक्री पाकिस्तानला करण्यात त्यांना यश आले आहे. त्यांच्यासाठी पाकिस्तान हे एक मांडलिक राष्ट्र आहे, असेही लष्करी अधिकाऱ्यांनी सांगितले.

### तुर्कस्तानची भूमिका काय?

या पार्श्वभूमीवर तुर्कस्तानची भूमिकाही कमी महत्त्वाची नव्हती. त्याने युद्धादरम्यान पाकिस्तानला ड्रोन आणि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांद्वारे मदत पुरवली, पण या सर्व सहाय्यांनंतरही पाकिस्तानला दारुण पराभवाचा सामना करावा लागला.

### भारताच्या नावाने खडे फोडणे सुरू..

पहलगाम येथे दहशतवादी हल्ला केल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर' ही कारवाई हाती घेऊन पाकिस्तानचे उट्टे काढले. यावेळी झालेल्या संघर्षात पाकिस्तानचे काही अब्ज रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यातून पाकिस्तानला सावरता येत नाही. त्यामुळे उठसूठ भारतावर आरोप करत सुटणे, हा त्यांचा एकमेव धंदा बनला आहे. त्यातून आता प्रत्यक्ष कारवाईच्या वेळी या अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला त्यांनीच पाकिस्तानचे तोंड बंद केल्यामुळे नुसती आगपाखड सुरू आहे.

### पाकिस्तानची अन्नान्न दशा, त्यात बलुचिस्तान वरचढ!

भारतांबरोबरील संघर्षात बॅकफूटवर गेलेल्या पाकिस्तानची अवस्था सध्या अत्यंत वाईट झाली असून त्यांची अन्नांन्न दशा झाली आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी किंवा जागतिक बँकेकडून कर्ज मिळाल्याशिवाय नागरिकांना अन्न पुरवणे देखील त्यांना अवघड बनले आहे. त्यातच त्यांचाच एक भाग असलेल्या बलुचिस्तानने स्वातंत्र्य मिळाल्याचे जाहीर केले असून रोज उर्वरित पाकिस्तान वर हल्ले चढवणे सुरू ठेवले आहे. पाकिस्तानच्या लष्कराला बलुची लष्कर मोठ्या प्रमाणावर वरचढ ठरले आहे आणि त्यांनी मुक्तीची घोषणाही केली आहे.

# महानगरपालिकेत प्लास्टिक बंदी!

## बाटल्या, कप, बुके यांचा वापर न करण्याच्या सूचना

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**‘महापालिकेच्या कार्यालयांमध्ये प्लास्टिकच्या फाइल्स, प्लास्टिक बाटल्या, कप, तसेच प्लास्टिकने सजविलेले बुके यांचा वापर पूर्णपणे बंद करावा,’ असे स्पष्ट आदेश अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी दिले आहेत. यामध्ये चहासाठी सर्रास वापरले जाणारे कागदी कपही बंद करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या कपांच्या आतील बाजूला प्लास्टिकचे आवरण असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.**




राज्य सरकारने प्लास्टिक बंदीचा निर्णय घेतल्यानंतर त्याची अंमलबजावणी कठोर होत नसल्याचे समोर आले आहे. मात्र, महापालिकेने त्याची कडक अंमलबजावणी करण्याचे ठरविले आहे. राज्य सरकारच्या पर्यावरण विभागाच्या २०१८ मधील अधिसूचनेनुसार, अविघटनशील प्लास्टिक व थर्मोकॉलच्या उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी व साठवणुकीवर बंदी घालण्यात आली आहे. या अधिसूचनेत वारंवार सुधारणाही करण्यात आल्या आहेत. त्याची कडक अंमलबजावणी करण्यायाचा निर्णय पुणे महापालिकेने घेतला आहे.महापालिकेतील अधिकाऱ्यांनी आपल्या विभागातील सर्व कर्मचारी व सहकाऱ्यांना हे आदेश तातडीने कळवावेत. त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी, असेही अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी यांनी काढलेल्या आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. हे आदेश सर्व क्षेत्रीय कार्यालये, परिमंडळ आणि विभागांकरीता लागू असणार आहेत. राज्य सरकारने प्लास्टिक बंदीचा निर्णय घेतल्यानंतर त्याची अंमलबजावणी कठोर होत नसल्याचे समोर आले आहे. मात्र, महापालिकेने त्याची कडक अंमलबजावणी करण्याचे ठरविले आहे. राज्य सरकारच्या पर्यावरण विभागाच्या २०१८ मधील अधिसूचनेनुसार, अविघटनशील प्लास्टिक व थर्मोकॉलच्या उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी व साठवणुकीवर बंदी घालण्यात आली आहे. या अधिसूचनेत वारंवार सुधारणाही करण्यात आल्या आहेत.त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी, असेही अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी यांनी काढलेल्या आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. हे आदेश सर्व क्षेत्रीय कार्यालये, परिमंडळ आणि विभागांकरीता लागू असणार आहेत.‘महापालिकेच्या कार्यालयांमध्ये प्लास्टिकच्या फाइल्स, प्लास्टिक बाटल्या, कप, तसेच प्लास्टिकने सजविलेले बुके यांचा वापर पूर्णपणे बंद करावा,’ असे स्पष्ट आदेश अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी दिले आहेत. यामध्ये चहासाठी सर्रास वापरले जाणारे कागदी कपही बंद करण्याच्या सूचना देण्यात आल्या

### काटेकोर अंमलबजावणी करावी


राज्य सरकारने प्लास्टिक बंदीचा निर्णय घेतल्यानंतर त्याची अंमलबजावणी कठोर होत नसल्याचे समोर आले आहे. मात्र, महापालिकेने त्याची कडक अंमलबजावणी करण्याचे ठरविले आहे. राज्य सरकारच्या पर्यावरण विभागाच्या २०१८ मधील अधिसूचनेनुसार, अविघटनशील प्लास्टिक व थर्मोकॉलच्या उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी व साठवणुकीवर बंदी घालण्यात आली आहे. या अधिसूचनेत वारंवार सुधारणाही करण्यात आल्या आहेत. त्याची कडक अंमलबजावणी करण्यायाचा निर्णय पुणे महापालिकेने घेतला आहे.महापालिकेतील अधिकाऱ्यांनी आपल्या विभागातील सर्व कर्मचारी व सहकाऱ्यांना हे आदेश तातडीने कळवावेत. त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी.

# गंगाधाम चौकाजवळील अपघात रोखणार

## उतार कमी करण्यासाठी 9 कोटी 16 लाखांची निविदा मान्य

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कोंढवा भागातून आईमाता मंदिरासमोरून गंगाधाम चौकाकडे येणाऱ्या डोंगर उतारावरील रस्त्याचा उतार कमी करण्याच्या कामासाठी ९ कोटी १६ लाख रुपयांची निविदा शुक्रवारी स्थायी समितीच्या बैठकीत मंजूर करण्यात आली. येथे असलेल्या तीव्र उतारामुळे होणाऱ्या अपघातांना या कामामुळे आळा बसणार आहे. असा दावा महापालिकेच्या पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी केला.**




गुलटेकडी, मार्केट यार्डजवळ असलेल्या गंगाधाम चौकातून मोठ्या प्रमाणावर वाहतूक होते. आईमाता मंदिरासमोरून गंगाधाम चौकाकडे येणाऱ्या तीव्र डोंगर उतारावरील रस्त्यावर सतत प्राणांतिक अपघात होतात. उतारावरून येताना वाहने अनियंत्रित होतात, असा निष्कर्ष काढून महापालिका प्रशासनाने हा उतार कमी करण्यासाठी हे काम हाती घेतले आहे. काही महिन्यांपूर्वी याच रस्त्यावर डंपरने दुचाकीला धडक दिल्याने महिलेचा मृत्यू झाला होता. त्यानंतर महापालिका प्रशासनाने तीव्र उतार कमी करण्याचा निर्णय जाहीर केला होता. याची निविदाही काढली होती. मात्र, ही निविदा रद्द करण्यात आली होती.गेल्या महिन्यात या चौकात झालेल्या अपघातामध्ये एका महिलेला आपला जीव गमवावा लागल्यानंतर नागरिकांनी संताप व्यक्त केला होता. महापालिका आयुक्तांसह, पोलिस आयुक्तांनी घटनास्थळी भेट देत तातडीने उपाययोजना करण्यात येईल, असे जाहीर केले होते. या दुर्घटनेनंतर महापालिका प्रशासनाने तातडीने या कामाची निविदा स्थायी समितीच्या मान्यतेसाठी ठेवली.

### तीव्र उतार कमी करण्याचा निर्णय

काही महिन्यांपूर्वी याच रस्त्यावर डंपरने दुचाकीला धडक दिल्याने महिलेचा मृत्यू झाला होता. त्यानंतर महापालिका प्रशासनाने तीव्र उतार कमी करण्याचा निर्णय जाहीर केला होता. याची निविदाही काढली होती. मात्र, ही निविदा रद्द करण्यात आली होती.गेल्या महिन्यात या चौकात झालेल्या अपघातामध्ये एका महिलेला आपला जीव गमवावा लागल्यानंतर नागरिकांनी संताप व्यक्त केला होता.

या कामासाठी तीन निविदा आल्या. त्यापैकी मोहनलाल मथरानी कन्स्ट्रक्शन प्रा.लि.ची २०.०१ टक्के सर्वात कमी दराची असलेली निविदा मान्यतेसाठी ठेवण्यात आली. या निविदेला शुक्रवारी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.गंगाधाम चौकात प्रामुख्याने कात्रज कोंढवा रस्त्यावरील कान्हा हॉटेल चौक ते गंगाधाम चौकापर्यंत असलेल्या रस्त्यावर जड वाहतुकीला पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी ही बंदी घातली आहे. या रस्त्यावरून दररोज मिक्सर, डंपर आणि मालवाहतूक करणारी जड वाहने येऊ नये, यासाठी लोखंडी हाईट बॅरिअर्स उभारण्यात आले आहेत. याची कामे सध्या सुरू आहेत.आईमाता मंदिरासमोरून गंगाधाम चौकाकडे येणाऱ्या तीव्र डोंगर उतारावरील रस्त्यावर सतत प्राणांतिक अपघात होतात. उतारावरून येताना वाहने अनियंत्रित होतात.

## भाजपा आमदार महेश लांडगे यांनी सभागृहात सुनावले

# धर्मांतराचा मुद्दा: हिंदू मुलींवर अत्याचार झाला त्यावेळी का नाही बोलला?

## आमदार जयंत पाटील, जितेंद्र आव्हाडांना खुले आव्हान

। मुंबई/ पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भयभीत तर हिंदू समाजातील लोकसद्धा झाले आहेत. 10 वर्षांच्या हिंदू मुलींवर पादऱ्यांनी अत्याचार केल्याचा गुन्हा सोनाई पोलीस ठाण्यात दाखल झाला. आमच्याकडे पुरावे आहेत. त्या अत्याचारी पादऱ्यांवर सभागृहात कोणीही बोलले नाही. कोणत्याही अल्पसंख्याक समाजाला घाबरण्याची गरज नाही. पण, हिंदू समाजावरील अत्याचाराविरोधात आम्ही बोलत असू, तर त्यावर आक्षेप घेण्याचीही गरज नाही. अल्पसंख्यात समाजात भीती आहे, असा चुकीचा संदेश (नॅरेटीव्ह) तयार करण्याचा प्रयत्न करु नये, अशा शब्दांत भाजपा आमदार महेश लांडगे सभागृहामध्ये आक्रमक भूमिका मांडली.**




ख्रिश्चन धर्म स्वीकारावा म्हणून अत्याचार केल्यामुळे सांगली येथील ऋतुजा राजगे या महिलेने सात महिन्यांची गरोदर असताना आत्महत्या केली होती. "प्राण सोडला.. पण धर्म नाही.." असा संदेश देत हिंदू समाजाने प्रचंड मोर्चे काढले. या मोर्चांमध्ये आमदार महेश लांडगे, आमदार गोपिचंद पडळकर यांच्यासह हिंदुत्त्ववादी नेत्यांनी प्रक्षोभक भाषणे केली. त्याचे पडसाद सभागृहात उमटले.

राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी सभागृहात सांगितले की, सांगलीतील धर्मांतराच्या घटनेनंतर मोठे मोर्चे काढण्यात आले. त्यामुळे अल्पसंख्याक समाजात भितीचे वातावरण आहे. तोच धागा पकडून आमदार जितेंद्र आव्हाड यांनी "पादऱ्यांचा सैराट करू.." अशी भाषणे सभागृहाचे सदस्य करीत आहेत. त्यामुळे राज्यातील ख्रिश्चन समाजात भिती निर्माण झाली आहे, अशी भूमिका मांडली.

भाजपाचे आमदार योगेश सागर यांनी धर्मांतराच्या मुद्यावर हिंदूत्ववादी बोलले, तर नॅरेटिव्ह तयार केला जातो. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राज्यात एकही दंगा झाला नाही. कोणताही अल्पसंख्याक समाज असुरक्षित नाही.

### राज्यात कायद्याचे राज्य...!

कॅबिनेट मंत्री आशिष शेलार यांनी सभागृहातील चर्चेवर स्पष्ट शब्दांमध्ये उत्तर दिले. महाराष्ट्रातील कोणत्याही समाजाला असुरक्षित वाटावे, अशी सरकारची भूमिका मुळीच नाही. राज्यात कायद्याचे राज्य आहे. प्रत्येक समाजाच्या स्वातंत्र्याचा विचार केला जात आहे. पण, राजकीय हेतुने काही नॅरेटिव्ह सेट केला जात असेल, तर त्याकडे दुर्लक्ष केले जाणार नाही. गुन्ह्याकडे गुन्हा म्हणूनच पाहिले जाईल. कोणत्याही समाजाला घाबरण्याचे कारण नाही.

> हिंदूवरील अत्याचाराच्या घटना घडत असताना, केवळ राजकीय हेतुने 'व्होट बँक' सांभाळण्यासाठी सभागृहात आणि सभागृहाबाहेरही काही नेते चुकीचा संदेश देण्याचा प्रयत्न करतात. हिंदूवरील अत्याचाराच्या घटनांवर तुम्ही काहीच बोलणार नाही आणि अल्पसंख्याक समाज असुरक्षित झाला म्हणून गळा काढणार हे कसे चालेल? हिंदूत्व आणि धर्म कार्यात कुणाचाही मुलाहिजा ठेवणार नाही. धर्मकार्य अविरत सुरू राहील.
> - **महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

---

# अनधिकृत बांधकाम आढळल्यास लगेच पाडा

## कारवाईस टाळाटाळ केल्यास अधिकाऱ्यांचे होणार निलंबन

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामावर तातडीने कारवाई करा. फुटपाथवर अतिक्रमण होणार नाही, यासाठी पथकांची नियुक्ती करा. कारवाईमध्ये सातत्य ठेवा, सर्व प्रभाग अधिकारी व बीट निरीक्षकांनी सतर्क राहावे. कारवाईमध्ये टाळाटाळ करणारे अधिकारी, कर्मचारी यांच्यावर तत्काळ निलंबनाची कारवाई केली जाईल, असा इशारा महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिला आहे.**






शहरातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणविरोधी मोहिमेचा आढावा आयुक्त सिंह यांनी घेतला. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, सह आयुक्त मनोज लोणकर, उपायुक्त राजेश आगळे, सहायक आयुक्तकिरणकुमार मोरे, अमित पंडित, अतुल पाटील, निवेदिता घार्गे, प्रशासन अधिकारी किशोर ननवरे, कार्यकारी अधिकारी लक्ष्मीकांत कोल्हे, विजय सोनवणे, सूर्यकांत मोहिते, उपअभियंता किरण माने उपस्थित होते.

आयुक्त सिंह म्हणाले, 'सध्या शहरात सुरू असलेल्या सर्व प्रकारच्या अनधिकृत बांधकामांवर तत्काळ कारवाई करण्यात यावी. नियमातील तरतुदीनुसार अशा बांधकामांवर कारवाई करण्यापूर्वी २४ तास अगोदर नोटीस द्या. महापालिका हद्दीत अनियमित बांधकामे व अतिक्रमणावर लक्ष ठेवण्यासाठी एक स्वतंत्र दक्षता पथक सक्रिय करण्यात आले आहे. या पथकाकडून मिळालेल्या अहवालाच्या आधारे संबंधितांवर कारवाई केलीजाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शहरातील कोणत्या प्रभागात अतिक्रमण, अनधिकृत बांधकामाची समस्या जास्त आहे, ही समस्या सोडविण्यासाठी कशाप्रकारे उपाययोजना सुरू आहेत, यावरही बैठकीत सविस्तर चर्चा झाली. अनधिकृत बांधकामे, पदपथ व नाल्यावर झालेले अतिक्रमण, परवानगीविना सुरू असलेले आठवडे बाजार याचाही आढावा बैठकीत आयुक्त सिंह यांनी घेतला.

> अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यासोबतच अशा प्रकारची बांधकामे होणार नाहीत, यासाठी विशेष काळजी घ्यावी. अतिक्रमण, अनधिकृत बांधकामाची समस्या सोडविण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायांवर भर देण्यासोबतच फिल्डवर असणाऱ्या अधिकाऱ्यांनी सातत्याने निरीक्षण करून तात्काळ पावले उचलावीत.
> **-प्रदीप जांभळे पाटील**
> अतिरिक्त आयुक्त पिंपरी चिंचवड मनपा

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग »



'स्टेट'मेंन्ट
राहुल जगताप

# सत्पुरुष व त्यांचा अनुग्रह.

सत्पुरुषाचा अनुग्रह झाला म्हणजे त्या व्यक्तीच्या प्रापंचिक आणि पारमार्थिक बाबतीत त्या सत्पुरुषाचीच सत्ता असते. सरकारच्या हातात सर्व सत्ता असते, आणि राज्ययंत्र सुरळीत चालण्याकरिता एकेका खात्याकडे एकेक कामगिरी सोपविलेली असते. कायद्याला धरून जोपर्यंत ते खाते आपले काम करीत असते, तोपर्यंत सरकार त्यात ढवळाढवळ करीत नाही; फक्त क्वचित् प्रसंगी आणि विशेष कारणांमुळेच, हस्तक्षेप करून सरकार आपल्या सत्तेचा उपयोग करते, आणि इच्छेप्रमाणे गोष्टी घडवून आणते. तोच नियम इथेही लागू आहे. प्रापंचिक बाबतीत ' प्रारब्ध ' हे एक खाते आहे, त्याचा संबंध देहापुरताच असतो. प्रत्येकाच्या प्रारब्धानुसार त्याला बऱ्यावाईट गोष्टी भोगाव्या लागतात. सत्पुरुष होता होईल तो त्यांत ढवळाढवळ करीत नाही. फक्त व्यक्तीच्या कल्याणाकरिताच जर जरूर असेल, तर सत्पुरुष त्यात ढवळाढवळ करील. पण परमार्थाच्या बाबतीत त्याची सर्व सत्ता असते. आपण मात्र त्याने सांगितलेल्या साधनात राहून, त्याला त्याची कामगिरी करण्यात अडथळा न येईल असे वागणे जरूर असते. हा अडथळा अनेक प्रकारचा असतो. एक म्हणजे, त्याने सांगितलेल्या साधनाबद्दल शंका घेणे; दुसरे, दुसऱ्याला अमुक एक दिवसांत साधले, मला अजून का साधत नाही, असा विचार मनात येणे; आणि तिसरे, सांगितलेल्या साधनापेक्षा काही अधिक किंवा कमी करण्याचा प्रयत्न करणे. थोडक्यात म्हणजे, एकदा संताच्या पायावर डोके ठेवल्यावर, आपला प्रपंच आणि परमार्थ ही दोन्ही त्याच्याकडे सोपवून, प्रपंचात घडणाऱ्या गोष्टी त्याच्याच इच्छेने घडताहेत अशी भावना ठेवून, आपले कर्तव्य करीत, त्याने सांगितलेल्या साधनात एकनिष्ठेने राहणे, हाच खरा मार्ग आहे.

संताच्या देहाकडे पाहण्याचे कारण नाही; त्याचा देह आमचे काम करीतच नाही. तो परमात्मस्वरूप आहे ही जी आपली भावना, ती आपले काम करते. संत अत्यंत दयाळू असतात. सत्पुरुषाला भगवंत भेटलेला असतो. म्हणून, सत्पुरुष हा देहाने या जगात राहतो असे दिसले, तरी अंतर्यामी तो भगवंतापाशीच असतो. म्हणून, आपण सत्पुरुषाकडे जात असताना या जगातल्या वस्तूविषयी वासना धरून गेलो, तर ते योग्य नव्हे. सत्पुरुषाला त्याच्या लक्षणांवरून ओळखता येणार नाही. पुस्तकामध्ये दिलेली जी लक्षणे असतात, त्यांच्या पलीकडे संत असतो. त्याला ओळखायला आपल्या अंगी थोडे तरी भगवंताचे प्रेम आवश्यक आहे. भगवंताचे प्रेम हे एक मोठे वेड आहे. ते ज्याला लागेल तो भाग्याचा खरा !

बोधवचन:- भगवंताच्या दास्यात जे प्रेम आहे ते जगाच्या मालकीत नाही.

# इतिहास को अगर समझो, राज को राज रहने दो ऽऽ!





'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**प्रसिद्ध खलनायक प्राण याचा एक जुना चित्रपट आठवला. 'धर्मा' असे त्याचे नाव ! त्यामध्ये एक कव्वालीचा मुकाबला सुरू असतो. त्यावेळी प्राण त्याच्या प्रतिस्पर्ध्यांना सुनावतो.. इशारोंको अगर समझो, राज को राज रहने दो !..या ओळींची आता आठवण एवढ्यासाठी झाली, की उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे बंधू एकत्र येण्याच्या चर्चेला चांगलेच उधाण आले आहे. त्यामुळे 'इतिहासको अगर समझो, राज को राज रहने दो !' असे म्हणावेसे वाटू लागले आहे.**

### हिंदी भाषिकांविरुद्ध आंदोलन..

हिंदी भाषिक म्हणजे उत्तर प्रदेश, बिहार येथून रोजगारासाठी मुंबई, पुणे, नाशिक येथे वास्तव्य करणाऱ्यांच्या विरोधात आंदोलन पेटले आहे. त्याचप्रमाणे, अमराठी असलेल्या जैन, मारवाडी, गुजराती हे देखील 'हिटलिस्ट' ला आहेतच! सुमारे १५ ते २० वर्षांपूर्वी शरद पवार म्हणाले होते, की बारामतीला आमच्या गोठ्यात दूध काढायला बिहारी लोक आहेत. मराठी लोक मिळत नाहीत, हे सुद्धा या अनुषंगाने आठवले. त्यानंतर निवडणूक काळात शरद पवारांनी माझ्या घरातील तरुण मतदार राज ठाकरे यांचे चाहते आहेत, ते 'मनसे' ला मतदान करतात. घरातले ज्येष्ठ मतदार माझ्या पक्षाला म्हणजे राष्ट्रवादीला मतदान करतात, असे म्हणत राज यांच्या ताकदीबद्दल भाष्य केले होते. याशिवाय, राज आणि उद्धव एक होत नाहीत, ते आम्हाला फायदेशीर आहे, असेही पवार म्हणाले होते. हे सर्व आपल्या संदर्भासाठी !

### राज ठाकरेंची ताकद बघितली..

राज ठाकरे यांच्या 'महाराष्ट्र नवनिर्माण सेने' चे तेरा आमदार होते. मुंबई, पुणे, नाशिक येथे बरेच नगरसेवक होत. नाशिक महानगरपालिकेत तर सत्ता होती ! त्यानंतर थेट जाऊ या, पुण्यात शरद पवारांची जाहीर मुलाखत राज ठाकरे यांनी घेतली,त्या प्रसंगाकडे ! तेव्हा राज यांनी 'रॅपिड फायर राऊंड' मध्ये प्रश्न विचारला होता, 'राज का उद्धव? यावर एरवी गुगली टाकणाऱ्या पवार यांनी 'ठाकरे फॅमिली' उत्तर देत षटकार ठोकला होता, आठवले का? त्यानंतर 'लाव रे तो व्हीडिओ..' म्हणत राज यांनी मोदी-शहा यांना 'टार्गेट' केले, तेव्हा राज यांच्या सभांना जो प्रचंड पाठिंबा मिळत गेला, त्याला काँग्रेस, राष्ट्रवादी यांचा मोठा पाठिंबा होता, असे आरोप झाले होते. त्यातच राज यांनी २०१४ च्या आधीच पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांना पाठिंबा दिला. 'सगळ्यात आधी मी म्हटलं' याचे श्रेयही राज घेत असतात.

### मोदी हे तर गुजरातचे पंतप्रधान..

त्यानंतर दिवसा पाठोपाठ दिवस जात होते, राज ठाकरे यांची राजकीय भूमिका बदलत जात होती. अशातच, नरेंद्र मोदी हे गुजरातचे पंतप्रधान आहेत का ? अशी टीका त्यांनी केली. काही दिवसात पुलवामा येथील हल्ल्याच्या घटनेबाबत शंका व्यक्त केली. पुन्हा, लोकसभेला 'लाव रे तो व्हीडिओ' हा एपिसोड झाला. नंतर सहा महिन्यात विधानसभा निवडणुका आल्या. या निवडणुकीवेळी एरवी 'मला एकहाती सत्ता द्या, महाराष्ट्राला सुतासारखा सरळ करतो' असे म्हणणाऱ्या राज ठाकरे यांनी 'सक्षम विरोधी पक्ष म्हणून मनसेला संधी द्या' असे आवाहन केले. राज ठाकरे तेच आहेत फक्त भूमिका बदलत आहेत हे लक्षात येण्यासारखे आहे !

### मराठी हृदयसम्राट, हिंदू जननायक..

यथावकाश 'मी महाराष्ट्राचा, महाराष्ट्र माझा', मराठी हृदयसम्राट ते हिंदू जननायक असा प्रवास झाला. झेंडा बदलला, इंजिनाची दिशा बदलली, अजेंडाही बदलला.

गेल्या लोकसभा निवडणुकीत फक्त मोदींना बिनशर्त पाठिंबा दिला. आपण भूमिका बदलल्या नाहीत, ठाम आहोत, असा राज यांचा दावा आहे, पण जनता ओळखून असते. शिवाजी पार्कवर आयोजित मोदींच्या सभेचे आयोजक राज होते. पिके काळी, बारामतीचे पोपट, पवारांनी दिलेली स्क्रिप्ट वाचतात, अशी टीका देवेंद्र आणि भाजपावाले करत होते. पण, राज यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे 'सीएए' ला पाठिंबा, मशिदीवरील भोंग्याना विरोध, अजान-हनुमान चालीसा यामुळे भाजप नेत्यांची पोपटपंची बदलली. देवेंद्र, एकनाथ शिंदे यांच्या कृष्णकुंज, शिवतीर्थ वरील फेऱ्या वाढल्या, हे पण लक्षात घ्या !

### शरद पवारांवर जातीयवादाचा आरोप..

शरद पवार जातीयवाद करतात, त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेनंतर महाराष्ट्रात जातीयवाद भडकला. राजकारणातील फोडाफोडी पवारांनी सुरू केली. शाहू, फुले आंबेडकर यांचे नाव घेणारे पवार छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेत नाहीत, अशी सातत्याने टीका करू लागल्याने राजकीयदृष्ट्या शरद पवार आणि राज ठाकरे संबंध कटू झाले, हे नक्की! निवडणूक काळात सभा घेऊन जाहीर भाषणे करून महाराष्ट्र पिंजून काढणारे दोन लोकप्रिय नेते म्हणजे राज आणि शरद पवार. शैली भिन्न पण, मराठी टीव्ही चॅनेल्सवर राज ठाकरे नेहमीच हिरो असतात. त्यांची सर्व भाषणे, पत्रकार परिषदा 'लाईव्ह' असतात. मनसैनिकांनी खळ्ळ-खट्याक केले, कानाखाली वाजवले, तर चोप दिला, अशी भूमिका असते, त्यावरच वृत्त समूहाच्या हिंदी वाहिन्यांवर गुंडा राज, इंग्रजी वाहिनी असेल तर ' गुंड' असा सर्रास उल्लेख असतो, याचीही अनेकांना प्रचिती आहेच!

### नेता तोच..कुठं हिरो, कुठं व्हीलन !

आपल्याकडील टॅक्सी चालक, पानवाले, पाणी पुरीवाले हे राज ठाकरे यांच्या निशाण्यावर असले तरी त्यांची अमिताभपासून विकी कौशलपर्यंत उत्तर भारतीय कलाकारांशी 'जानी दोस्ती' आहे. सलमान, आमिर, जावेद अख्तर यांच्याशी पण जिव्हाळ्याचे संबंध आहेत. यांच्यापैकी आमिरने सुहास लिमयेसरांची मराठी शिकवणी लावली होती, विकी ठीक ठाक मराठी बोलतो, बाकीचे बोलण्याच्या नावाने आनंदी आनंद असला, तरी भीती युक्त का होईना आदर दाखवतात.

### हिंदीला विरोध नाही..

एकूण परिस्थिती पाहता, राज ठाकरे यांचा हिंदी भाषेला त्यांचा विरोध नाही. भाषा थोपवण्याला, सक्तीला आहे, हे त्यांनी वेळोवेळी स्पष्ट केले आहे. हेतू किंवा उद्देश बरोबर पण मार्ग चुकीचा, असे कायम त्यांच्या आंदोलनांबद्दल म्हटले गेले आहे. 'मोस्ट मिसअंडरस्टुड' लीडर असेही त्यांचे वर्णन केले जाते. शरद पवार आता राज यांना महत्व देत नाहीत, गांभीर्याने घेत नाहीत. भाजपा, नरेंद्र मोदी यांच्याशी पण राज यांची 'लव्ह- हेट' रिलेशनशिप आहे, हे सुद्धा मान्य ! राज हे उद्धव ठाकरे यांच्या सोबत मराठीच्या मुद्द्यावर एकत्र आले असले तरी,राजकीय युती बाबत निर्णय न झाल्याने भाजपावाले पण 'राज यांना सोडा, उद्धवना झोडा' या मोडवर आहेत. गेली ५० वर्षे
महाराष्ट्राचे राजकारण पवार आणि ठाकरे यांच्या भोवती फिरत राहिले आहे. मोठे पवार यांची पावर पुतण्याने कमी केलीआहे. ठाकरे ब्रँड
ची कसोटी लागली आहे, अशी वस्तुस्थिती आहे.

### राज यांची अनाकलनीय भूमिका..

एकूण इतिहास पाहता, राज ठाकरे यांची भूमिका नेहमीच अनाकलनीय राहिली आहे. त्यांचे विचार नेहमी चौकटीच्या बाहेर असतात. त्यामुळे ठाकरे बंधूंचे मनोमीलन आणि पुन्हा 'ठाकरे पॅटर्न' हे मुद्दे तकलादू वाटू लागले आहेत. निवडणुकीचा फड जवळ येत आहे, त्यामुळे राज ठाकरे कोणाच्या बाजूने शड्डू ठोकणार हे ही स्पष्ट होणार आहे !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मुंबई भोंगेमुक्त! मुख्यमंत्र्यांचा दावा

## नवीन भोंगे आढळल्यास स्थानिक पोलीस जबाबदार



। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यात ध्वनिप्रदूषण प्रतिबंधात्मक कायद्याची कठोर अंमलमबजावणी सुरू आहे. मुंबई हे राज्यातील पहिले भोंगेमुक्त शहर ठरले आहे. अशाच प्रकारे राज्यातील अन्य शहरे भोंगेमुक्त करण्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी विधानसभेत दिली.**

आतापर्यंत ३ ,३६७ धार्मिक स्थळांवरील भोंगे काढून टाकण्यात आले असून यापुढे ज्या भागात अनधिकृत भोंगे आढळून येतील तेथे स्थानिक पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकास जबाबदार धरण्यात येणार असून प्रत्येक पोलीस आयुक्तालयात स्वतंत्र भरारी पथक स्थापन करण्यात येणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले. धार्मिक स्थळावरील भोंगे,ध्वनिक्षेपकामुळे होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाबाबत सुधीर मुनगंटीवार यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेदरम्यान फडणवीस बोलत होते.धार्मिक स्थळावरील भोंग्यामुळे होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाबाबत न्यायालयाच्या आदेशानुसार सरकारने प्रमाणित कार्यप्रणाली(एसओपी) जाहीर केली आहे.

त्यानुसार मुंबई पोलिसांनी १६०८ धार्मिक स्थळावरील भोंगे हटविले असून त्यात ११४९ मशिदी, ४८ मंदिर, १० चर्च, ४ गुरुद्वार आणि १४८ इतर धार्मिक स्थळांचा समावेश आहे. आता मुंबईतील एकाही धार्मिक स्थळावर अनधिकृत भोंगा नाही. मुंबईबाहेर राज्यभरात १७५९ सर्व धर्मिय धार्मिक स्थळावरील भोंगे हटविण्यात आले असून याचा पूर्तता अहवालावरही न्यायालयाने समाधान व्यक्त केल्याचे फडणवीस यांनी सांगितले प्रमाणित कार्यप्रणाली(एसओपी) लागू झाल्यापासून एप्रिल व मे महिन्यात एकूण ७१ गुन्हे दाखल झाले असून ध्वनिप्रदूषणाविरुद्ध केलेल्या कारवाईवर देखरेख ठेवण्यासाठी विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.तसेच प्रमाणित कार्यप्रणालीत काही बदल करण्यात येणार असून ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनाधिकृत भोंगे आढळून येतील तेथील वरिष्ठ पोलीस निरीक्षकास जबाबदार धरण्यात येणार आहे.

तसेच भरारी पथकांच्या माध्यमातूनही अनधिकृत भोग्यांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.नवरात्रोत्सव, गणेशोत्सव काळात पोलिसांची परवानगी घेऊन आणि ध्वनिप्रदूषणाच्या मर्यादा पाळूनही मंडळांना पोलीस नाहक त्रास देतात, अशी तक्रार आदित्य ठाकरे यांनी केली असता, रितसर परवानगी घेऊन तसेच नियमात उत्सव साजरे करणाऱ्या मंडळांना कोणताही त्रास होणार नाही. पोलिसांनी नाहक त्रास देऊ नये याबाबत सूचना दिल्या जातील, असेही फडणवीस यांनी सांगितले. राष्ट्रवादीचे अनिल पाटील यांनी शिवसेना खासदार संजय राऊत यांना उल्लेख न करता, राज्यातील भोंग्यावर कारवाई केलीत. पण सकाळच्या १० च्या भोंग्यावर कारवाई कधी करणार अशी विचारणा केली. त्यावर ध्वनिप्रदूषणाविरोधात कायदा असला तरी विचारांच्या तो कायदा झाला की विचार करू, असा टोला फडणवीस यांनी लगावला.

### 'सकाळच्या भोंग्याचे काय?'

आतापर्यंत ३ ,३६७ धार्मिक स्थळांवरील भोंगे काढून टाकण्यात आले असून यापुढे ज्या भागात अनधिकृत भोंगे आढळून येतील तेथे स्थानिक पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकास जबाबदार धरण्यात येणार असून प्रत्येक पोलीस आयुक्तालयात स्वतंत्र भरारी पथक स्थापन करण्यात येणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले. धार्मिक स्थळावरील भोंगे,ध्वनिक्षेपकामुळे होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाबाबत सुधीर मुनगंटीवार यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेदरम्यान फडणवीस बोलत होते.धार्मिक स्थळावरील भोंग्यामुळे होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाबाबत न्यायालयाच्या आदेशानुसार सरकारने प्रमाणित कार्यप्रणाली(एसओपी) जाहीर केली आहे. त्यानुसार मुंबई पोलिसांनी १६०८ धार्मिक स्थळावरील भोंगे हटविले असून त्यात ११४९ मशिदी, ४८ मंदिर, १० चर्च, ४ गुरुद्वार आणि १४८ इतर धार्मिक स्थळांचा समावेश आहे.

# शनि शिंगणापूर देवस्थानमध्ये आर्थिक घोटाळा

## मंदीर विश्वस्तांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश




। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अहिल्यानगर जिल्ह्यातील शनि शिंगणापूर देवस्थानमधील विश्वस्तांनी मोठ्याप्रमाणात आर्थिक अनियमितता आणि गैरव्यवहार केल्याचे धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या चौकशीतून समोर आले असून या घोटाळयातील जबाबदार विश्वस्तांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच जे विश्वस्त लोकसेवकांच्या व्याख्येत येतात, त्यांच्या संपत्तीचीही चौकशी केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी विधानसभेत केली.**

विठ्ठल लंघे, सुरेश धस आदींनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून शनि शिंगणापूर देवस्थानमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराचा मुद्दा उपस्थित केला होता.

शनि शिंगणापूर देवस्थानच्या विश्वस्तांनी चक्क देवालाही सोडले नाही. सर्वच कामात प्रंचड घोटाळा केला आहे. या देवस्थानमध्ये बनावट ॲप आणि पावत्यांद्वारे देणगी वसूल करून तसेच हजारो बनावट कर्मचाऱ्यांची नोंद करून कोटयावधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे चौकशी अहवालातून स्पष्ट झाल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.या घोटाळ्याची सरकारने गंभीर दखल घेतली असून सायबर विभागाच्या अप्पर पोलीस महासंचालकाच्या देखरेखीखाली पोलिसांकडून याचा स्वतंत्र तपास सुरू करण्यात आला आहे. तर मंदिर व्यवस्थापनाशी संबधित अधिकारी आणि विश्वस्तांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले असून याचा तपासही बाहेरचे अधिकारी करतील.तसेच जे विश्वस्त लोकसेवकांच्या व्याख्येत येतात, त्यांच्या संपत्तीची चौकशी केली जाईल असेही फडणवीस यांनी यावेळी सांगितले. त्याचप्रमाणे विश्वस्तमंडळ बरखास्त करण्याची प्रक्रिया सुरू असून लवकरच मंदिरांवर शिर्डी, पंढरपूर प्रमाणे सरकारचा कारभार सुरू होईल असेही फडणवीस यांनी सांगितले.

### तपासही बाहेरचे अधिकारी करतील

विठ्ठल लंघे, सुरेश धस आदींनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून शनि शिंगणापूर देवस्थानमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराचा मुद्दा उपस्थित केला होता. शनि शिंगणापूर देवस्थानच्या विश्वस्तांनी चक्क देवालाही सोडले नाही. सर्वच कामात प्रंचड घोटाळा केला आहे. या देवस्थानमध्ये बनावट ॲप आणि पावत्यांद्वारे देणगी वसूल करून तसेच हजारो बनावट कर्मचाऱ्यांची नोंद करून कोटयावधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे चौकशी अहवालातून स्पष्ट झाल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.या घोटाळ्याची सरकारने गंभीर दखल घेतली असून सायबर विभागाच्या अप्पर पोलीस महासंचालकाच्या देखरेखीखाली पोलिसांकडून याचा स्वतंत्र तपास सुरू करण्यात आला आहे. तर मंदिर व्यवस्थापनाशी संबधित अधिकारी आणि विश्वस्तांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले असून याचा तपासही बाहेरचे अधिकारी करतील.

# बिहारची निवडणूक गैरप्रकार करण्याचा डाव!

## काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा भाजपवर आरोप

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महाराष्ट्राप्रमाणेच बिहारमध्येही आगामी विधानसभा निवडणुकीत भाजपकडून गैरप्रकाचे प्रयत्न होत आहत. परंतु 'इंडिया' आघाडी भाजपचा हा डाव हाणून पाडेल, असा इशारा काँग्रेस नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी दिला. भाजपकडून देशभरात संविधानावर हल्ले होत आहेत, असा आरोपही त्यांनी केला.**



भुवनेश्वर येथे पक्षाच्या 'संविधान बचाओ सामवेश' कार्यक्रमाला संबोधित राहुल गांधी यांनी भाजपला लक्ष्य केले. भाजप सत्तेत असल्यावर सर्वसामान्यांकडे दुर्लक्ष करून केवळ भांडवलदारांसाठी काम करते. 'जल, जंगल, जमीन' (पाणी, जंगल आणि जमीन) आदिवासींचे आहे आणि त्यांचेच राहील असे सांगून, ओडिशाच्या भाजप सरकारने पंचायत (अनुसूचित क्षेत्रांमध्ये विस्तार) कायदा, १९९६ अद्याप लागू केला नसल्याचा दावा राहुल यांनी केला.आदिवासींना वन हक्काचे पट्टे दिले जात नाहीत. काँग्रेसने 'पेसा' आणि 'आदिवासी विधेयक' आणले आहे.आम्ही हे कायदे लागू करू आणि आदिवासींना त्यांची जमीन मिळेल, याची खात्री करू, असे गांधी म्हणाले. ओडिशातील आधीच्या बिजू जनता दलाने (बिजू) जे केले, त्याप्रमाणेच आताचे भाजप सरकार राज्याला लुटत आहे, असा आरोपही राहुल यांनी केला.इंडिया आघाडीतील घटक पक्षांची गुरुवारी बैठक पार पडली. या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या बिहारमधील विधानसभा निवडणुका भाजपला हायजॅक करण्यापासून रोखण्याचा निर्धार या बैठकीत करण्यात आल्याचे राहुल गांधी यांनी सांगितले.

तसेच भारतीय निवडणूक आयोग (ईसीआय) आपले कर्तव्य बजावत नसून भाजपच्या हितासाठी काम करत असल्याचा आरोपही राहुल यांनी केला.भुवनेश्वर येथे पक्षाच्या 'संविधान बचाओ सामवेश' कार्यक्रमाला संबोधित राहुल गांधी यांनी भाजपला लक्ष्य केले. भाजप सत्तेत असल्यावर सर्वसामान्यांकडे दुर्लक्ष करून केवळ भांडवलदारांसाठी काम करते. 'जल, जंगल, जमीन' (पाणी, जंगल आणि जमीन) आदिवासींचे आहे आणि त्यांचेच राहील असे सांगून, ओडिशाच्या भाजप सरकारने पंचायत (अनुसूचित क्षेत्रांमध्ये विस्तार) कायदा, १९९६ अद्याप लागू केला नसल्याचा दावा राहुल यांनी केला.आदिवासींना वन हक्काचे पट्टे दिले जात नाहीत.

काँग्रेसने 'पेसा' आणि 'आदिवासी विधेयक' आणले आहे. आम्ही हे कायदे लागू करू आणि आदिवासींना त्यांची जमीन मिळेल, याची खात्री करू, असे गांधी म्हणाले. ओडिशातील आधीच्या बिजू जनता दलाने (बिजू) जे केले, त्याप्रमाणेच आताचे भाजप सरकार राज्याला लुटत आहे, असा आरोपही राहुल यांनी केला.इंडिया आघाडीतील घटक पक्षांची गुरुवारी बैठक पार पडली. या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या बिहारमधील विधानसभा निवडणुका भाजपला हायजॅक करण्यापासून रोखण्याचा निर्धार या बैठकीत करण्यात आल्याचे राहुल गांधी यांनी सांगितले. तसेच भारतीय निवडणूक आयोग (ईसीआय) आपले कर्तव्य बजावत नसून भाजपच्या हितासाठी काम करत असल्याचा आरोपही राहुल यांनी केला.

### गांधी यांनी भाजपला लक्ष्य केले

आम्ही हे कायदे लागू करू आणि आदिवासींना त्यांची जमीन मिळेल, याची खात्री करू, असे गांधी म्हणाले. ओडिशातील आधीच्या बिजू जनता दलाने (बिजू) जे केले, त्याप्रमाणेच आताचे भाजप सरकार राज्याला लुटत आहे, असा आरोपही राहुल यांनी केला.इंडिया आघाडीतील घटक पक्षांची गुरुवारी बैठक पार पडली. या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या बिहारमधील विधानसभा निवडणुका भाजपला हायजॅक करण्यापासून रोखण्याचा निर्धार या बैठकीत करण्यात आल्याचे राहुल गांधी यांनी सांगितले. तसेच भारतीय निवडणूक आयोग (ईसीआय) आपले कर्तव्य बजावत नसून भाजपच्या हितासाठी काम करत असल्याचा आरोपही राहुल यांनी केला.भुवनेश्वर येथे पक्षाच्या 'संविधान बचाओ सामवेश' कार्यक्रमाला संबोधित राहुल गांधी यांनी भाजपला लक्ष्य केले.

# संविधानातून समाजवाद वगळण्याचा प्रयत्न

## काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांचा भाजपवर हल्लाबोल

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भाजपच्या नेतृत्वातील केंद्र सरकार संविधानातून 'धर्मनिरपेक्षता' आणि 'समाजवाद' वगळण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केला. पक्षाच्या 'संविधान बचाओ' कार्यक्रमाला संबोधित करताना खरगे यांनी भाजपच्या राजवटीत आदिवासी, दलित, महिला आणि युवकही सुरक्षित नसल्याचे खरगे म्हणाले.**




काँग्रेस सरकारने भारतात १६० सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम स्थापन केले, तर भाजप सरकारने त्यापैकी २३ उपक्रमांचे खासगीकरण केले, असा आरोपदेखील खरगे यांनी केला. काँग्रेसच्या काळातील सार्वजनिक संपत्ती केंद्र सरकार विकत असून संविधान नष्ट करणे हाच त्यांचा अजेंडा असल्याचे खरगे म्हणाले. गरीब आणि आदिवासींचे रक्षण करण्यासाठी काँग्रेसने २००६ मध्ये वन हक्क कायदा आणला होता. हा कायदा नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार कमकुवत करण्याचा प्रयत्न करीत आहे, असा आरोपदेखील त्यांनी केला. खरगे यांनी ओडिशातील भाजप समर्थकांवर दलित आणि सरकारी अधिकाऱ्यांवर हल्ला केल्याचा आरोपही केला. ओडिशाच्या गंजममध्ये दोन दलित पुरुषांवर अत्याचार करण्यात आला, भुवनेश्वरमध्ये एका सरकारी अधिकाऱ्यावरही सार्वजनिक हल्ला करण्यात आला, असा दाखलादेखील त्यांनी दिला. उद्योगाच्या नावाखाली भाजप सरकार सर्वत्र जंगले नष्ट करत आहे. जर दलित, आदिवासी आणि तरुण त्यांच्या हक्कांसाठी लढायला शिकले नाही तर ते त्यांनाही नष्ट करतील.काँग्रेस सरकारने भारतात १६० सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम स्थापन केले, तर भाजप सरकारने उपक्रमांचे खासगीकरण केले, असा आरोपदेखील खरगे यांनी केला. काँग्रेसच्या काळातील सार्वजनिक संपत्ती केंद्र सरकार विकत असून संविधान नष्ट करणे हाच त्यांचा अजेंडा असल्याचे खरगे म्हणाले.

### गंजममध्ये दलित पुरुषांवर अत्याचार

काँग्रेसने २००६ मध्ये वन हक्क कायदा आणला होता. हा कायदा नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार कमकुवत करण्याचा प्रयत्न करीत आहे, असा आरोपदेखील त्यांनी केला.खरगे यांनी ओडिशातील भाजप समर्थकांवर दलित आणि सरकारी अधिकाऱ्यांवर हल्ला केल्याचा आरोपही केला. ओडिशाच्या गंजममध्ये दोन दलित पुरुषांवर अत्याचार करण्यात आला, भुवनेश्वरमध्ये एका सरकारी अधिकाऱ्यावरही सार्वजनिक हल्ला करण्यात आला, असा दाखलादेखील त्यांनी दिला. उद्योगाच्या नावाखाली भाजप सरकार सर्वत्र जंगले नष्ट करत आहे. जर दलित, आदिवासी आणि तरुण त्यांच्या हक्कांसाठी लढायला शिकले नाही तर ते त्यांनाही नष्ट करतील.भाजपच्या नेतृत्वातील केंद्र सरकार संविधानातून 'धर्मनिरपेक्षता' आणि 'समाजवाद' वगळण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप काँग्रेसखरगे यांनी केला.

# अमृता सुभाषने शेअर केले तब्बूबरोबरचे फोटो

भिनेत्री अमृता सुभाष ही तिच्या मराठी-हिंदी चित्रपटातील भूमिकांसाठी ओळखली जाते. नुकतीच जारण या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. 'जारण' हा भयपट असून अनिता दाते आणि अमृता सुभाष या प्रमुख भूमिकांत दिसल्या होत्या. या चित्रपटाला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. आता अभिनेत्री तिच्या चित्रपटामुळे नाही तर तिच्या एका पोस्टमुळे चर्चेत आली आहे.अमृताने नुकतीच 'फिल्मफेअर'मध्ये हजेरी लावली होती. मराठी कलाकारांसह अभिनेत्री तब्बू, राजकुमार राव आणि नवाजुद्दीन सिद्दीकी यांनीदेखील हजेरी लावली होती. आता अमृताने सोशल मीडियावर तब्बूसह, नीना कुळकर्णी आणि इतर कलाकारांबरोबरचे काही फोटो शेअर केले आहेत.हे फोटो शेअर करताना अमृताने तब्बूबाबत लिहिले की फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्याच्या निमित्ताने मी माझ्या आयुष्यात पहिल्यांदाच तब्बूला भेटले. ती आपल्या सगळ्यांचीच आवडती अभिनेत्री आहे. पण, ती एक उत्तम माणूसदेखील आहे. आम्हा दोघींना एकत्र काम करायचे आहे. ही इच्छा लवकरच पूर्ण होईल, याची खात्री आहे. माझ्या मनात कृतज्ञता आहे. पुढे अभिनेत्री असेही म्हणाली, "फिल्मफेअरच्या मंचावर 'जारण'च्या यशासाठी माझ्या मराठी चित्रपटसृष्टीनं ज्या टाळ्या वाजवल्या, त्या अनमोल आहेत", असे म्हणत अभिनेत्रीने तिच्या भावना व्यक्त केल्या.भिनेत्री अमृता सुभाष ही तिच्या मराठी-हिंदी चित्रपटातील भूमिकांसाठी ओळखली जाते. नुकतीच जारण या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आली होती.

# 'सिलसिला'मधील 'तो' सीन होतोय व्हायरल

बॉलीवूडमधील अनेक प्रेमकहाण्या अशा आहेत, ज्यांची चर्चा वर्षानुवर्षे होते. यामध्ये ऐश्वर्या राय व सलमान खान, संजीव कपूर व हेमा मालिनी यांच्याबरोबरच अमिताभ बच्चन व रेखा यांच्या नात्याची आजही चर्चा होताना दिसते. अमिताभ बच्चन व रेखा यांनी अनेक चित्रपटांत एकत्र काम केले आहे. दोघेही बॉलीवूडमधील दिग्गज कलाकार आहेत. अमिताभ बच्चन आजही विविध भूमिका साकारत प्रेक्षकांचे मनोरंजन करतात. तर रेखादेखील अनेक कार्यक्रमांना उपस्थिती लावत सर्वांची मने जिंकतात. अमिताभ बच्चन, जया बच्चन व रेखा या त्रिकुटाबद्दल अनेकदा चर्चा होताना दिसते. आता हे त्रिकुट पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. याचे कारण म्हणजे 'सिलसिला' चित्रपटातील एक सीन सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. १९८१ साली प्रदर्शित झालेल्या या चित्रपटात अभिनेत्री जया बच्चन, रेखा आणि अमिताभ प्रमुख भूमिकेत होते. या चित्रपटात या तीन कलाकारांच्या खऱ्या आयुष्याचे प्रतिबिंब दिसते. जया बच्चन यांनी सिलसिलामध्ये शोभा मल्होत्रा तर रेखा यांनी चंदिनी आनंद हे पात्र साकारले आहे. याबरोबरच, अमिताभ बच्चन यांनी अमित हे पात्र साकारले आहे.शोभा व अमित यांचे लग्न झाले आहे. तर चंदिनी अमितच्या प्रेमात आहे. एकाच व्यक्तीवर प्रेम असलेल्या दोन महिलांमधील हा संवाद आता सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.

# नयनताराने सोडलं मौन



नयनताराचे नाव दक्षिण चित्रपटसृष्टीतील सुंदर आणि लोकप्रिय अभिनेत्रींच्या यादीत समाविष्ट आहे. तिला या इंडस्ट्रीमध्ये एक सुपरस्टार म्हणून ओळखले जाते. नयनतारा केवळ तिच्या चित्रपटांमुळेच नाही तर तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळेही चर्चेत असते. गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर अशी अफवा पसरली आहे की, नयनतारा आणि तिचा पती विघ्नेश शिवन यांच्यात सर्व काही ठीक नाही आणि दोघेही घटस्फोट घेणार आहेत. या चर्चांवर तिने स्वतः मौन सोडले आणि अफवा पसरवणाऱ्यांना चोख प्रत्युत्तर दिले.खरं तर, काही दिवसांपासून सोशल मीडियावर एक बनावट स्क्रीनशॉट व्हायरल होत आहे, ज्यामध्ये नयनताराने तिच्या लग्नाला मोठी चूक म्हटले आहे. यानंतर तिच्या लग्नात समस्या निर्माण झाल्याच्या बातम्या पसरू लागल्या आणि अभिनेत्री तिचा पती विघ्नेशला घटस्फोट देणार आहे, ही बातमी ऐकल्यानंतर तिचे चाहतेही खूप काळजीत पडले होते. आता नयनताराने या अफवांना उत्तर म्हणून एक पोस्ट शेअर केली आहे.नयनताराने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटच्या स्टोरीवर ही पोस्ट शेअर केली आहे, ज्यामध्ये ती पती विघ्नेशबरोबर दिसली आणि दोघेही आश्चर्यकारक प्रतिक्रिया देताना दिसले. हे शेअर करताना अभिनेत्रीने कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, "आमची प्रतिक्रिया... जेव्हा आपण स्वतःबद्दल विचित्र बातम्या पाहतो.." नयनताराने तिच्या स्वतःच्या स्टाईलमध्ये तिच्या लग्नाबद्दल ही खोटी बातमी पसरवणाऱ्यांना जोरदार प्रत्युत्तर दिले आहे.अभिनेत्री नयनताराने २०२२ मध्ये विघ्नेश शिवनशी लग्न केले. लग्नानंतर हे जोडपे जुळ्या मुलांचे पालक बनले. कामाबरोबरच दोघेही सोशल मीडियावरही खूप सक्रिय असतात.

# उर्मिला नैराश्यातून कशी बाहेर पडली?

उर्मिला निंबाळकरने काही वर्षे अभिनय क्षेत्रात काम केल्यानंतर तिने आता युट्यूबर म्हणून तिची वेगळी ओळख निर्माण केली आहे. महिलांच्या जीवनशैलीशी निगडीत ती अनेक गोष्टीं सोशल मीडियावर शेअर करत असते. उर्मिला निंबाळकर सध्या यशस्वी युट्यूबरपैकी एक आहे. तिच्या युट्यूब चॅनेलवर ती लाइफस्टाइल,मेकअप आणि ट्रॅव्हल अशा विविध विषयांवर ती व्हिडीओ शेअर करते. मुलींची सुरक्षा, करिअर, आर्थिक गुंतवणूक अशा विषयांवर ती तज्ञांशी गप्पा मारतानादेखील दिसते.सध्या तिला यशस्वी म्हटले जात असले तरी तिच्या आयुष्यात असा एक काळ होता, जेव्हा तिला नैराश्याचा सामना करावा लागला होता.आता उर्मिलाने नुकतीच लोकमत सखीला मुलाखत दिली. या मुलाखतीत ती नैराश्यातून कशी बाहेर आली, यावर वक्तव्य केले आहे. उर्मिला म्हणाली, "मला असं वाटतं की प्रत्येकाला कधीतकी खूप मोठ्या प्रमाणात कोणत्या ना कोणत्या गोष्टींमध्ये अपयश येतं. अपयशाबद्दल फारसं कोणी बोलत नाही. त्या गोष्टी फार कोणासमोर येत नाहीत. त्यामुळे आपल्याला असं वाटतं की हे आपल्याबरोबरच असं होत आहे. बाकी सगळ्यांचं छान सुरू आहे. ज्या लोकांनी काहीतरी वैशिष्ट्यपूर्ण केलं आहे. मग ते सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात असेल, करिअर, अगदी नात्यांमध्ये असेल त्या सगळ्यांनी खूप मोठ्या प्रमाणात अपयश पचवलेलं असतं. त्यांच्याकडून चुका झालेल्या असतात. खूप चांगली माणसं त्यांना सोडून गेलेली असतात.लोकांना त्यांच्याविषयी गैरसमज झालेला असतो. आजार झालेले असतात, अनेक महत्वाच्या गोष्टी गमवाव्या लागतात. त्यानंतर खूप मोठ्या गोष्टी मिळवलेल्या असतात. या सगळ्यातून जावं लागतं. त्याशिवाय यश मिळत नाही. पण, आपल्याकडे कोणी इतकं वास्तववादी सांगत नाही. बऱ्याचदा माध्यम नसतं. भीती, लाज वाटते. का सांगावं,असंही वाटतं. पण, यशस्वी लोकं दु:ख सहन करतात. काबाडकष्ट करतात. पुढे उर्मिला म्हणाली, "जेव्हा मी नैराश्यातून जात होते. त्यावेळी आपल्याला कळत नाही की त्याची तीव्रता किती आहे. म्हणजे खूप काळ उठावसं वाटायचं नाही.

# मला फसवलं, आमचं ब्रेकअप झाले



आपल्या अभिनय कौशल्याने प्रेक्षकांना भुरळ घालणारी अभिनेत्री विद्या बालन सध्या तिच्या आगामी चित्रपटाच्या प्रमोशनसमध्ये व्यग्र आहे. रोमँटिक कॉमेडी चित्रपट 'दो और दो प्यार' येत्या शुक्रवारी म्हणजेच १९ एप्रिलला चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाद्वारे विद्या बालन पुन्हा एकदा नवी भूमिका घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी विद्या बालन आणि अभिनेता प्रतीक गांधीने इन्स्टंट बॉलीवूडला भेट दिली. नुकत्याच 'इन्स्टंट बॉलीवूड'ला दिलेल्या मुलाखतीत विद्याने आपल्या पहिल्या प्रेमाबद्दल सांगितलं. मुलाखतदाराने पहिल्यांदा प्रेमात पडल्याचा किस्सा विचारला असता विद्या म्हणाली, "मी जेव्हा पहिल्यांदा प्रेमात पडले तेव्हा मी १५ वर्षांची होते. ते फक्त आकर्षण होतं आणि प्रेम नव्हतं. पण तेव्हा मला वाटायचं की, मला माझं प्रेम मिळालं आहे. आता याच्याबरोबरच लग्न, याच्याबरोबरच आयुष्य घालवणार आणि हेच माझं नशीब आहे. नंतर काही दिवसांनी मला त्याची वेगळीच बाजू दिसली आणि मला ते आवडलं नाही, पटलं नाही, मग मी त्याचा विचार सोडून दिला."पहिल्यांदा झालेल्या हार्टब्रेकबद्दलही विद्या बालनने सांगितलं. ती म्हणाली, "मी ज्या मुलाला पहिल्यांदा डेट केलेलं त्याने माझं हार्टब्रेक केलं, कारण त्याने मला फसवलं होतं. आमचं नुकतचं ब्रेकअप झालेलं आणि व्हॅलेन्टाईन्स डेला तो मला कॉलेजमध्ये दिसला. आम्ही एकाच कॉलेजमध्ये होतो. तो मला म्हणाला की, मी माझ्या एक्स गर्लफ्रेंडबरोबर डेटला जातोय. मी यावर त्याला ओके म्हटलं. कारण तेव्हा मला खूप त्रास झाला होता. मी सांगूही शकत नाही इतकं वाईट वाटलेलं मला."चित्रपटातील विद्या बालनचा सहकलाकार प्रतीक गांधीनेही त्याच्या प्रेमाबद्दल सांगितलं. प्रतीक एकदाच प्रेमात पडला आणि दोन वर्षे मागे लागून त्याने त्याची पत्नी भामिनी ओझाशीचं लग्न केलं.दरम्यान, शीर्षा गुहा ठाकुरता दिग्दर्शित 'दो और दो प्यार' चित्रपटाबद्दल सांगायचं झालं तर, या चित्रपटात विद्या बालनसह प्रतीक गांधी, इलिआना डिक्रुझ, सेंधिल राममूर्ती यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. १९ एप्रिलला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आपल्या अभिनय कौशल्याने प्रेक्षकांना भुरळ घालणारी अभिनेत्री विद्या बालन सध्या तिच्या आगामी चित्रपटाच्या प्रमोशन्समध्ये व्यग्र आहे.

# जेनिक सिनरची अंतिम फेरीत धडक!

## जोकोविचला सरळ सेटमध्ये नमवलं; अंतिम फेरीत भिडणार?

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जगातील मानाची टेनिस स्पर्धा म्हणून ओळखली जाणारी विम्बल्डन २०२५ स्पर्धा शेवटच्या टप्प्यात पोहोचली आहे. या स्पर्धेतील उपांत्य फेरीचा सामना जेनिक सिनर आणि नोवाक जोकोविच या दोघांमध्ये पार पडला. या सामन्यात दोन्ही खेळाडूंमध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळाली. शेवटी जेनिक सिनरने नोवाक जोकोविचला सरळ सेटमध्ये पराभूत करत विम्बल्डन २०२५ स्पर्धेतील अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. आता पुन्हा एकदा अंतिम फेरीत कार्लोस अल्काराझ आणि जेनिक सिनर यांच्यात जेतेपदासाठी लढत रंगणार आहे.**



सिनरने या सामन्यात जोकोविचला पूर्णपणे बॅकफूटवर ठेवलं. त्याने हा सामना ६-३, ६-३,६-४ ने आपल्या नावावर केला. जोकोविचकडे २५ वे ग्रँडस्लॅम जिंकण्याची संधी होती. पण सिनरमुळे त्याचं हे स्वप्नं हुकलं आहे.या सामन्यात जोकोविचने दमदार सुरुवात केली. त्याने पहिला गेम आपल्या नावावर केला. त्यानंतर सिनरने पुनरागमन केलं. तिसऱ्या गेममध्ये सिनरने ब्रेक पॉईंट मिळवत आघाडी घेतली. सिनरने हा सेट ६-४ ने आपल्या नावावर केला. दुसरा सेट सिनरने ६-३ ने नावावर केला. सरळ दोन सेट जिंकल्यानंतर तिसऱ्या सेट ६-४ ने आपल्या नावावर करत सरळ सेटमध्ये जोकोविचचा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला.विम्बल्डन २०२५ स्पर्धेतील पुरुष एकेरीतील अंतिम सामना सिनर विरुद्ध अल्काराझ यांच्यात रंगणार आहे. अल्काराझने उपांत्य फेरीच्या सामन्यात टेलर फ्रिट्झचा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. त्याने हा सामना ६-४, ७-५, ६-३, ७-६ ने आपल्या नावावर केला. हे दोघे या आधीही फ्रेंच ओपन २०२५ स्पर्धेतील अंतिम सामन्यात आमनेसामने आले होते. या सामन्यात सिनरला जेतेपदासाठी प्रबळ दावेदार मानलं जात होतं.पण शेवटी अल्काराझने कमबॅक करत फ्रेंच ओपन २०२५ स्पर्धेच्या जेतेपदावर नाव कोरलं होतं. त्यामुळे यावेळी सिनरकडे या पराभवाचा बदला घेण्याची संधी असणार आहे.स्पर्धा म्हणून ओळखली जाणारी विम्बल्डन २०२५ स्पर्धा शेवटच्या टप्प्यात पोहोचली आहे. या स्पर्धेतील उपांत्य फेरीचा सामना जेनिक सिनर आणि नोवाक जोकोविच या दोघांमध्ये पार पडला. या सामन्यात दोन्ही खेळाडूंमध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळाली. शेवटी जेनिक सिनरने नोवाक जोकोविचला सरळ सेटमध्ये पराभूत करत विम्बल्डन २०२५ स्पर्धेतील अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. आता पुन्हा एकदा अंतिम फेरीत कार्लोस अल्काराझ आणि जेनिक सिनर यांच्यात जेतेपदासाठी लढत रंगणार आहे.

सिनरने या सामन्यात जोकोविचला पूर्णपणे बॅकफूटवर ठेवलं. त्याने हा सामना ६-३, ६-३,६-४ ने आपल्या नावावर केला. जोकोविचकडे २५ वे ग्रँडस्लॅम जिंकण्याची संधी होती. पण सिनरमुळे त्याचं हे स्वप्नं हुकलं आहे.या सामन्यात जोकोविचने दमदार सुरुवात केली. त्याने पहिला गेम आपल्या नावावर केला. त्यानंतर सिनरने पुनरागमन केलं. तिसऱ्या गेममध्ये सिनरने ब्रेक पॉईंट मिळवत आघाडी घेतली. सिनरने हा सेट ६-४ ने आपल्या नावावर केला. दुसरा सेट सिनरने ६-३ ने नावावर केला. सरळ दोन सेट जिंकल्यानंतर तिसऱ्या सेट ६-४ ने आपल्या नावावर करत सरळ सेटमध्ये जोकोविचचा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला.विम्बल्डन २०२५ स्पर्धेतील पुरुष एकेरीतील अंतिम सामना सिनर विरुद्ध अल्काराझ यांच्यात रंगणार आहे. अल्काराझने उपांत्य फेरीच्या सामन्यात टेलर फ्रिट्झचा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. त्याने हा सामना ६-४, ७-५, ६-३, ७-६ ने आपल्या नावावर केला. हे दोघे या आधीही फ्रेंच ओपन २०२५ स्पर्धेतील अंतिम सामन्यात आमनेसामने आले होते.

### जेतेपदासाठी प्रबळ दावेदार मानलं

या सामन्यात सिनरला जेतेपदासाठी प्रबळ दावेदार मानलं जात होतं. पण शेवटी अल्काराझने कमबॅक करत फ्रेंच ओपन २०२५ स्पर्धेच्या जेतेपदावर नाव कोरलं होतं. त्यामुळे यावेळी सिनरकडे या पराभवाचा बदला घेण्याची संधी असणार आहे.स्पर्धा म्हणून ओळखली जाणारी विम्बल्डन २०२५ स्पर्धा शेवटच्या टप्प्यात पोहोचली आहे. या स्पर्धेतील उपांत्य फेरीचा सामना जेनिक सिनर आणि नोवाक जोकोविच या दोघांमध्ये पार पडला. या सामन्यात दोन्ही खेळाडूंमध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळाली. शेवटी जेनिक सिनरने नोवाक जोकोविचला सरळ सेटमध्ये पराभूत करत विम्बल्डन २०२५ स्पर्धेतील अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. आता पुन्हा एकदा अंतिम फेरीत कार्लोस अल्काराझ आणि जेनिक सिनर यांच्यात जेतेपदासाठी लढत रंगणार आहे. सिनरने या सामन्यात जोकोविचला पूर्णपणे बॅकफूटवर ठेवलं. त्याने हा सामना ६-३, ६-३,६-४ ने आपल्या नावावर केला. जोकोविचकडे २५ वे ग्रँडस्लॅम जिंकण्याची संधी होती.

# आर्चरचं १५९६ दिवसांनंतर पुनरागमन

## पहिल्याच षटकात अशी घेतली जैस्वालची विकेट

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये सुरू असलेल्या ५ कसोटी सामन्यांच्या मालिकेतील तिसरा कसोटी सामना लॉर्ड्सच्या मैदानावर सुरू आहे. या सामन्यात इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. इंग्लंडकडून जो रूटने शतकी खेळी केली. तर भारतीय संघाकडून गोलंदाजी करताना जसप्रीत बुमराहने सर्वाधिक ५ गडी बाद केले.**




इंग्लंडचा पहिला डाव ३८७ धावांवर आटोपला. या धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाला सुरूवातीलाच मोठा धक्का बसला.भारतीय संघाकडून डावाची सुरूवात करण्यासाठी यशस्वी जैस्वाल आणि केएल राहुलची जोडी डावाची सुरूवात करण्यासाठी मैदानात आली. या जोडीकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा होती. जैस्वालने डावातील पहिल्याच चेंडूवर चौकार मारत डावाची सुरूवात केली. त्या त्याने ८ चेंडूत १३ धावांची खेळी केली. यादरम्यान त्याने एकाच षटकात ३ चौकार मारले. मात्र, जोफ्रा आर्चरने टाकलेल्या वेगवान चेंडूवर त्याला आपली विकेट फेकून माघारी परतावं लागलं.इंग्लंडचा वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरने १५९६ दिवसांनंतर कसोटी क्रिकेटमध्ये कमबॅक केलं आहे. तो २०२१ मध्ये आपला शेवटचा कसोटी सामना खेळण्यासाठी मैदानात उतरला होता. त्यानंतर त्याला दुखापतीमुळे संघाबाहेर व्हावं लागलं होतं. आता कमबॅक करताच त्याने पहिल्याच षटकात यशस्वी जैस्वालला बाद करत माघारी धाडलं आहे. ज्यावेळी जोफ्रा आर्चर गोलंदाजीला आला,

### यशस्वीला माघारी परतावं लागलं

त्यावेळी सामना पाहण्यासाठी आलेल्या प्रेक्षकांनी टाळ्या वाजवून त्याचं कौतुक केलं.तर झाले असे की, इंग्लंडकडून दुसरे षटक टाकण्यासाठी जोफ्रा आर्चर गोलंदाजीला आला. या षटकातील सुरूवातीचे २ चेंडू जैस्वालने खेळून काढले. मात्र तिसऱ्या चेंडूवर जैस्वालची बत्ती गुल झाली. जोफ्रा आर्चरने ओव्हर द विकेटचा मारा करताना लेग स्टंपवर चेंडू टाकला. हा चेंडू टप्पा पडताच बाहेर निघाला. या चेंडूवर जैस्वालने खेळून काढण्याचा प्रयत्न केला. पण चेंडू बॅटची कडा घेत दुसऱ्या स्लिपमध्ये गेला.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। शनिवार ।

।दि. 12 जुलै 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## IT फोरम, सोसायटी फेडरेशन आणि सोसायटी प्रतिनिधींनी व्यक्त केले समाधान

# "हिंजवडी आयटी पार्क"साठी मुख्यमंत्र्यांकडे "व्हिजन"!

## हिंजवडीतील समस्यांवर "अंडरपास, पर्यायी रस्ते, मेट्रो डेडलाईन"चा मुख्यमंत्र्यांचा तोडगा

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**हिंजवडीसारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आयटी हबसाठी भक्कम रस्ते, सार्वजनिक वाहतूक व नियोजन महत्त्वाचे आहे. या दृष्टिकोनातून आगामी काळात या भागामध्ये अंडरपास, पर्यायी रस्ते, मेट्रोची डेडलाईन काटेकोरपणाने पाळली जाईल. विभागीय आयुक्तांच्या माध्यमातून सिंगल पॉईंट अॅथॉरिटीद्वारे सर्व समन्वय करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी दिल्यामुळे हिंजवडीतील समस्या सुटण्यासाठी आशादायी चित्र निर्माण झाल्याच्या भावना व्यक्त करण्यात येत आहेत.**



हिंजवडी आयटी पार्कमधील वाढत्या नागरी व वाहतूक समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी IT फोरम आणि सोसायटी फेडरेशनच्या प्रतिनिधींनी गुरुवारी विधानभवनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची यांची भेट घेतली. ही महत्त्वपूर्ण बैठक भाजपाचे आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने आयोजित केली होती. यावेळी आयटी फोरमचे सचिन लोंढे, सोसायटी फेडरेशनचे संजीवन सांगळे , बाणेर-बालेवाडी रेसिडेन्ट असोसिएशनचे अमेय जगताप, सारंग वाबळे , महाळुंगे रेसिडेन्ट असोसिएशनचे पवनजीत माने आदि उपस्थित होते.

### मुख्यमंत्र्यांकडे व्हिजन : माने

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंजवडीतील स्थानिक रहिवासी, येजा करणारे नोकरदार, उद्योजक या सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले आहे. पहिल्यांदाच सर्व जबाबदार विभागांचे एकत्रीकरण करून बैठक घेण्यात आली. समोरासमोर सर्व मुद्दे स्पष्ट करण्यात आले. उद्योजकांच्या, नोकरदार तसेच नागरिकांच्या प्रश्नाबाबत टोलवाटोलवी झाली नाही. त्यामुळे आशादायी चित्र निर्माण झाले आहे.हिंजवडी आयटी पार्कची समस्या सोडवण्यासाठी मेट्रोचे काम डिसेंबर अखेर पूर्ण करण्यात येईल अशी डेडलाईन दिल्यामुळे वाहतूक कोंडी दूर होण्यासाठी दिलासा मिळाला आहे.



### हिंजवडीतील वाहतूक कोंडीवर 'फास्टट्रॅक' उपाय : जगताप

बाणेर बालेवाडी पाषाण रेसिडेन्स असोसिएशनचे अमेय जगताप म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वप्रथम जबाबदार सर्व विभागांना एकत्रितरित्या समोरासमोर आणून बैठक घेतली. यातून समस्या नक्की कुठे निर्माण होत आहेत याची माहिती मिळाली. हद्दीचा वाद, भूसंपादन, अर्धवट कामे यावर 'ऑन द स्पॉट' चर्चा झाली. हिंजवडी आयटी पार्क मधील प्रस्तावित रस्ते आणि पायाभूत सुविधा सक्षम करण्यासाठी 'फास्टट्रॅक' वर कालबद्ध नियोजन करण्यात येणार आहे.

### प्रस्तावित पर्यायी रस्त्यांमुळे आशादायी चित्र : वाबळे

बाणेर बालेवाडी पाषाण रेसिडेन्स असोसिएशनचे सारंग वाबळे म्हणाले, बाणेर, बालेवाडी आणि पाषाण हा भाग वाहतूक कोंडीच्या विळख्यात अक्षरशः सापडला आहे दहा मिनिटाच्या कामासाठी दीड ते दोन तास वाहतूक कोंडीमध्ये अडकावे लागते. याची माहिती मुख्यमंत्री महोदयासमोर आम्ही मांडली. ही वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी तातडीने उपाय योजना करण्यात याव्या असे देखील सांगितले. मुख्यमंत्र्यांकडून सूर्य हॉस्पिटलपासून वाकडमार्गे हिंजवडी फेज ३ पर्यंत PMRDA हद्दीतून ३० मीटर रुंदीचा पर्यायी रस्ता आरक्षित करून विकसित करण्याबाबतचा पर्याय ठेवण्यात आला आहे.

### कालबद्ध कार्यक्रम आखून दिल्याने समस्या सुटतील : सांगळे

चिखली मोशी सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे म्हणाले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंजवडी तसेच पिंपरी चिंचवड मधील उद्योजकांना भेडसावणारे अनेक समस्यांबाबत तातडीने बैठक घेत समस्यांची दखल घेतली. याबद्दल मुख्यमंत्र्यांचे आभार व्यक्त करणे आवश्यक आहे. पहिल्यांदाच सर्व जबाबदार विभाग एकत्र येत समन्वयातून प्रश्न सुटण्याबद्दल चर्चा झाली. पर्यायी रस्ते अंडरपास, उड्डाणपूल तसेच हिंजवडी मधील मेट्रो यातून नोकरदार, उद्योजक आणि सोसायट्यांमधील नागरिकांचे प्रश्न नक्कीच सुटणार आहेत. आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून तातडीने बैठक आयोजित करण्यात आली आमच्या समस्या थेट मुख्यमंत्र्यांसमोर मांडता आल्या. महत्त्वाचे म्हणजे सिंगल ऍथॉरिटी नेमून कालबद्ध कार्यक्रम समस्या सोडवण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी दिल्याने आमच्यासमोर आशादायी चित्र निर्माण झाले आहे.


DNYANVARDHINI PRATISHTHAN'S
VIDYA VALLEY
NORTH POINT COLLEGE
Recognised by Govt. of Maharashtra
Affiliated to SNDT WOMEN'S UNIVERSITY
ADMISSIONS OPEN 25-26
B.SC
INFORMATION TECHNOLOGY
LIGHTING THE PATH TO EXCELLENCE
REGISTER NOW
KEY FEATURES:
• Scholarship for Girl Student as per Government Rules
• Qualified & Experienced Staff
• Hands on Practical Sessions
• Timely interaction with Parents/Guardians
• Syllabus as per National Education Policy -2020
• Well Equipped Laboratories
• MoU with different IT Industries
• Earn & Learn Scheme
• Guidance for Competitive Examinations
CAREER OPPORTUNITIES:
• Software Developer
• Web Developer
• Project Manager
• Database Administrator
• IT Consultant
• Software Test Manger
• Software Engineer
ACTIVITES:
• Induction program
• Guest lectures/Workshops/Seminars
• Industrial visit, Internship support
• Promoting for Extra-curricular Activities
• Soft skill Tranining
• Pre-Placement Activities
Scan Me
For
Adimission
Contact Us
9422537623 / 9422537626
vinfo@vidyavalleynpcollege.edu.in
Plot No. 3, Shivtej Nagar, Chinchwad, Pune, Maharashtra, India - 411 019

# जागतिक स्तरावर MIT कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, आळंदीचा झंकार!

## ‘ग्लोबल युनिव्हर्सिटी रँकिंग फॉर इनोव्हेशन 2025’ मध्ये टॉप 100 मध्ये

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड, पुणे: MIT कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, आळंदी (पुणे) या प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थेने जागतिक स्तरावर आपली ठसा उमटवत ग्लोबल युनिव्हर्सिटी रँकिंग फॉर इनोव्हेशन 2025 मध्ये तिन्ही प्रमुख श्रेणींमध्ये टॉप १०० रँकिंगमध्ये स्थान मिळवून अभूतपूर्व यश संपादन केले आहे.**



या मानांकनात संस्था मूल्ये आणि संस्कृती या श्रेणीत ७ वे जागतिक स्थान, विद्यार्थी सहभाग आणि सहाय्य या श्रेणीत ४७ वे स्थान, तर उद्योजकता वृत्ती या श्रेणीत ५३ वे स्थान मिळवून संस्थेने जागतिक स्तरावर आपली नाविन्यपूर्ण, मूल्याधारित आणि विद्यार्थी-केंद्रित शिक्षणपद्धती सिद्ध केली आहे. या यशाबद्दल महाविद्यालयाचे संचालक प्रा. डॉ. बी. बी. वाफरे, उपसंचालिका अक्षदा कुलकर्णी, उपसंचालिका मानसी अतीतकर, कुलसचिव डॉ. शरद कदम, विभागप्रमुख, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यमान विद्यार्थी, माजी विद्यार्थी आणि सर्व हितधारक यांचे संयुक्त योगदान अतुलनीय आहे.

### आंतरराष्ट्रीय शैक्षणिक नकाशावर ओळख...

या घवघवीत यशामागे संस्थेचे कार्यकारी संचालक डॉ. सुनील कराड यांचे दूरदर्शी नेतृत्व आणि प्रेरणादायी मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे. तसेच, ग्लोबल युनिव्हर्सिटी रँकिंग फॉर इनोव्हेशन या मानांकनाच्या प्रस्तावाच्या तयारीसाठी प्रा. अभिजीत नेटके यांचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे. ही यशस्वी झेप हे MIT महाविद्यालयाच्या मूल्याधारित, नवोन्मेषशील आणि विद्यार्थीनिष्ठ शिक्षणदृष्टीकोनाचे फलित असून, सर्व घटकांच्या एकत्रित आणि समर्पित प्रयत्नांची साक्ष आहे. या ऐतिहासिक कामगिरीमुळे आळंदीतील ही संस्था केवळ भारतातच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय शैक्षणिक नकाशावर ठळकपणे अधोरेखित झाली आहे.

# शिक्षण विश्व: सायबर सुरक्षा जनजागृतीसाठी प्रतिभा

## कॉलेजचे विद्यार्थी सज्ज ‘क्लब ऑफिसर’ म्हणून विद्यार्थ्यांची निवड

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सायबर गुन्ह्यांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या क्विक हिल फाउंडेशनच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत, चिंचवड येथील प्रतिभा कॉलेज आणि क्विक हिल फाउंडेशन यांच्यात सामंजस्य करार झाला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेविषयी जागृती निर्माण करणे, विविध कार्यशाळा, परिसंवाद आणि सायबर गुन्ह्यांविरोधात सशक्त जनजागृती मोहिमा राबविणे हे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.**




महाविद्यालयात झालेल्या विशेष बैठकीत संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा, खजिनदार डॉ. भूपाली शहा, संचालिका तेजल शहा, प्रभारी प्राचार्या डॉ. क्षितीजा गांधी, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरीया आणि क्विक हिल फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांच्या उपस्थितीत या उपक्रमाचा शुभारंभ झाला.

या कार्यक्रमात प्रतिभा महाविद्यालयातील नेतृत्वगुणांनी परिपूर्ण असलेल्या काही उत्साही विद्यार्थ्यांची ‘क्लब ऑफिसर’ म्हणून निवड करण्यात आली असून, त्यांच्या माध्यमातून संपूर्ण वर्षभर सायबर सुरक्षा विषयक उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येणार आहेत.

यावेळी क्लबच्या पदग्रहण समारंभात अनुपमा काटकर यांच्या हस्ते अधिकृत क्लबची स्थापना झाली. क्लबमध्ये श्रावणी सामंत अध्यक्ष, आकाश ठाकूर सचिव, ओलीव वर्गिस उपक्रम प्रमुख, तर मानसी वाडेकर मीडिया प्रमुख म्हणून कार्यभार सांभाळणार आहेत. शिक्षक समन्वयक म्हणून डॉ. हर्षिता वाच्छानी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी फाउंडेशनचे असोसिएट डायरेक्टर अजय शिर्के, सीएसआर एक्झिक्युटर गायत्री पवार-केसकर आणि दीपू सिंघ यांचे मोलाचे योगदान लाभले आहे.

### सायबर सुरक्षित भारताच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल...

विद्यार्थ्यांना या मोहिमेसाठी क्विक हिल फाउंडेशनच्या वतीने सायबर सुरक्षा विषयक विशेष प्रशिक्षणही देण्यात आले असून, या माध्यमातून समाजात सायबर जागरूकतेचा जागर सुरू होणार आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल सुरक्षा आणि जबाबदारीची जाणीव निर्माण होणार असून, हे पाऊल सायबर सुरक्षित भारताच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.

# एस.पी.जी. इंटरनॅशनल पब्लिक स्कूलमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात

## शिक्षण विश्वः गुरुशिष्य परंपरेचे जतन करत विद्यार्थ्यांकडून गुरुजनांचा सन्मान

। पिंपरी-चिंचवड, पुणे:
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गुरुशिष्य परंपरेला साजेशा भक्तिभावाने व श्रद्धेने एस.पी. जी. इंटरनॅशनल पब्लिक स्कूल, भोसरी येथे १० जुलै २०२५ रोजी गुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री. पांडुरंग नाना गवळी आणि सुनीता माई गवळी यांनी भूषवले. यावेळी शाळेचे संचालक श्री. नितीन लोणारी, मुख्याध्यापक डॉ. प्रवीण गायकवाड व उपमुख्याध्यापिका सौ. नेहा खांडेकर यांच्या हस्ते सरस्वती पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.**



मुख्याध्यापक डॉ. प्रवीण गायकवाड यांनी आपल्या भाषणात गुरुपौर्णिमेचे महत्त्व उलगडून सांगितले. “गुरुजन हेच जीवनात प्रकाश देणारे दीपस्तंभ असून त्यांच्या मार्गदर्शनामुळेच विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल होते,” असे ते म्हणाले.

विद्यार्थ्यांनी या प्रसंगी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. गुरुशिष्य नात्याचे महत्व सांगणारे नाट्य, भक्तिगीते आणि मनोवेधक सादरीकरणातून त्यांनी आपले गुरूंप्रती आदर व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी गुरुजनांना पुष्पगुच्छ, भेटवस्तू देत त्यांचा सन्मान केला.

### ... हीच खरी गुरुदक्षिणा!

गुरुजनांनी विद्यार्थ्यांना सद्वर्तन, नम्रता व शिस्त याबाबत मार्गदर्शन केले. “गुरुंच्या शिकवणीचे आचरणात पालन करणे, हाच खरी गुरुदक्षिणा आहे,” असा सल्ला त्यांनी दिला.हा कार्यक्रम गुरु-शिष्य परंपरेचे जतन करणारा, विद्यार्थ्यांमध्ये संस्कारांची पेरणी करणारा आणि भावनिकदृष्ट्या प्रत्येकासाठी संस्मरणीय ठरला. सर्व शिक्षक, विद्यार्थी आणि पालकवर्गाने या कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

# शिक्षण विश्वः विद्या व्हॅली नॉर्थ पॉइंट स्कूलमध्ये गुरु पौर्णिमा उत्साहात!

## गुरुंच्या मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत विद्यार्थ्यांची भावनिक अभिव्यक्ती

। पिंपरी-चिंचवड, पुणे: ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विद्या व्हॅली नॉर्थ पॉइंट स्कूलमध्ये १० जुलै २०२५ रोजी गुरु पौर्णिमा अत्यंत श्रद्धा आणि उत्साहाने साजरी करण्यात आली. यानिमित्ताने एक विशेष सकाळची प्रार्थना सभा आयोजित करण्यात आली होती, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी आपले गुरु — जे ज्ञान, मूल्ये आणि जीवनदृष्टी देतात — यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.**







या विशेष दिवशीचे महत्त्व विद्यार्थ्यांनी इंग्रजी, हिंदी आणि मराठी भाषांतील मनापासून केलेल्या भाषणांतून अधोरेखित करण्यात आले. या भाषणांमधून भारतातील सांस्कृतिक वैविध्य आणि गुरुंच्या भूमिकेचे सार्वत्रिक महत्त्व अधोरेखित झाले. कार्यक्रमाचे भावनिक वातावरण सोलो गाणे आणि गटगान अशा हृदयस्पर्शी संगीत सादरीकरणांनी अजूनच उंचावले. या गायनातून विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती प्रेम आणि आदर व्यक्त केला.

हा संपूर्ण कार्यक्रम भक्ती, भावनिक अभिव्यक्ती आणि शिक्षकांविषयीच्या कृतज्ञतेचा एक सुंदर संगम होता. यामुळे सर्व उपस्थितांना प्रेरणा मिळाली आणि गुरू आपल्या जीवनात किती महत्त्वाची भूमिका बजावतात, याची आठवणही झाली.

# पालखी सोहळ्याने एसपीजी इंटरनेशनल स्कूल गजरात निनादले!

## पारंपरिक वेशभूषा, अभंगगायन आणि टाळ-मृदंगाच्या साथीत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

। पिंपरी-चिंचवड, पुणे: ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**एसपीजी इंटरनेशनल पब्लिक स्कूल, भोसरी येथे दिनांक १८ जून रोजी पारंपरिक आणि पावन अशा पालखी सोहळ्याचे उत्साही आयोजन करण्यात आले. सकाळी ८ वाजता सुरू झालेल्या या सोहळ्याला शाळेच्या सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला.**





कार्यक्रमाची सुरुवात संत तुकाराम व संत ज्ञानेश्वर यांच्या मूर्ती पूजनाने झाली. पूजन सोहळा श्री. पांडुरंग नाना गवळी, श्री. नितिन मधुकर लोणारी आणि श्री. स्वप्निल पांडुरंग गवळी यांच्या हस्ते पार पडला. त्यानंतर आरती करण्यात आली आणि संपूर्ण परिसर भक्तिमय झाला.

शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून टाळ-मृदंगाच्या गजरात पालखी प्रदक्षिणा घेतली.

अभंगगायन सादर करत विद्यार्थ्यांनी वारकरी संप्रदायाचा जिवंत अनुभव उपस्थितांना दिला. इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी रांगोळी, फलक सजावट, घोषवाक्य आणि गीतांच्या सादरीकरणातून सोहळ्याचे सौंदर्य वाढवले.

### संतांच्या विचारातून जीवनाला दिशा...

मुख्याध्यापक डॉ. प्रवीण गायकवाड यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणात संत तुकाराम आणि संत ज्ञानेश्वर यांचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यावर भर दिला. त्यांनी सांगितले की, "संतांच्या विचारांमधून जीवनाला दिशा मिळते, आणि हे विचार वर्तनात उतरवले तरच खरे शिक्षण पूर्ण होते." कार्यक्रमाच्या शेवटी पालखी मिरवणूक पार पडली व उपस्थितांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. संपूर्ण सोहळा आनंद, श्रद्धा व संस्कृतीच्या वातावरणात साजरा करण्यात आला.

# डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात उद्या प्रवेश मार्गदर्शन सत्र

## विद्यार्थी व पालकांसाठी प्रवेश प्रक्रियेबाबत सखोल माहिती देणारं व्याख्यान

। पिंपरी-चिंचवड, पुणे: । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, आकुर्डी येथे शनिवार, १२ जुलै २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता शांताई सभागृहात अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेबाबत विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले आहे.**




या व्याख्यानात विद्यार्थ्यांना व पालकांना प्रवेश प्रक्रियेतील विविध टप्पे, शाखा निवडीची पद्धत, कागदपत्रांची पूर्तता, ऑप्शन फॉर्म भरताना घ्यावयाची काळजी, तसेच प्राधान्यक्रम निश्चित करताना विचारात घ्यावयाचे निकष याबाबत सविस्तर माहिती दिली जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीत योग्य निर्णय घेण्यासाठी प्रेरणादायी ठरणाऱ्या या सत्रात, नामांकित करिअर मार्गदर्शक प्रा. केदार टाकळकर यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. त्यांनी आजवर हजारो विद्यार्थ्यांना योग्य दिशा दाखवली असून, त्यांच्या अनुभवाचा फायदा उपस्थितांना होणार आहे.

### विद्यार्थी-पालकांनी लाभ घ्यावा...

या कार्यक्रमासाठी डॉ. डी. वाय. पाटील शैक्षणिक संकुलाचे चेअरमन मा. सतेज पाटील, प्रतिष्ठानचे विश्वस्त मा. तेजस पाटील, संकुलाचे संचालक रियर एडमिरल अमित विक्रम (निवृत्त), महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. पी. मालती आणि प्रशासकीय अधिष्ठाता डॉ. संदीप सरनोबत यांचे विशेष मार्गदर्शन लाभले आहे. विद्यार्थ्यांनी, पालकांनी व शिक्षकांनी या उपयुक्त मार्गदर्शन सत्राचा लाभ घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्या डॉ. सौ. पी. मालती आणि महाविद्यालय प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

### कुठे आणि कधी?

स्थळ: शांताई सभागृह, डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, आकुर्डी, पुणे
दिनांक व वेळ: शनिवार, १२ जुलै २०२५ | सकाळी १०:३० वाजता
संपर्क: डॉ. सौ. मनीषा तनवर – ९८८१०६०९१२

# शिक्षण विश्व: गुरुंच्या चरणी श्रद्धा, विद्यार्थ्यांच्या मनात संस्कारांची पेरणी

## गुरु पौर्णिमेनिमित्त संत साई हायस्कूलमध्ये भक्तिभावाने गुरुंचा सन्मान

। पिंपरी-चिंचवड, पुणे: । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**संत साई हायस्कूल, भोसरी येथे गुरू पौर्णिमेनिमित्त विद्यार्थ्यांनी भक्तिभावाने आणि आनंदात गुरूंचा सन्मान करत कार्यक्रम साजरा केला. शाळेचे संस्थापक व मुख्याध्यापक श्री. शिवलिंग ढवळेश्वर सर आणि मुख्याध्यापिका सौ. सुनिता ढवळेश्वर मॅडम यांच्या पाद्यपूजनाने व औक्षणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. संत साई बाबांच्या प्रतिमेचे पूजन व आरतीने वातावरण भक्तिमय झाले होते.**





विद्यार्थ्यांनी वर्गाच्या बाहेर रांगोळ्या काढून आपल्या शिक्षकांचे औक्षण करत स्वागत केले. इयत्ता ५वी, ७वी व ८वीच्या विद्यार्थ्यांनी गुरूंचे महत्त्व सांगणारी नाटिका सादर केली. शिक्षिका सौ. स्वाती गोसावी यांनी "गुरू-शिष्य नाते" यावर प्रेरणादायी विचार मांडले. मुख्याध्यापक श्री. शिवलिंग ढवळेश्वर सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना गुरूंचे स्थान आणि त्यांची महती विषद केली. त्यांनी आपल्या अध्यात्मिक गुरू श्री. सिद्धेश्वर महास्वामीजी यांनी लिहिलेल्या पत्राचा संदर्भ देत त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या पत्राचे इंग्रजी वाचन कु. पायल ढवळेश्वर मॅडम यांनी, तर मराठी वाचन श्री. भागवत वानखेडे सर यांनी केले.

### विद्यार्थी- पालकांचा उत्स्फूर्त सहभाग...

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये उपमुख्याध्यापिका सौ. रूपाली खोल्लम, मनोज वाबळे सर, व कला शिक्षक श्री. संजय अनर्थे यांचे विशेष सहकार्य लाभले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षिका श्वेता नारायणगावकर यांनी केले. या कार्यक्रमात सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक वर्गाचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. गुरू पौर्णिमेच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी आपल्या संस्कृतीतील 'गुरू महात्म्य' समजून घेतले आणि गुरूंप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

